MHB U0700 16072 022

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल दि. | २१.१०.२०२२ | | |
| नोंदणी दि. | २१.१०.२०२२ | | |
| निकाल दि. | ०२.०५.२०२४ | | |
| कालावधी | ०१ वर्ष | ०६ म. | ११दि |

*सि.एन.आर.क्र.एम.एच.बी.यु.०७-००१६०७-२०२२*

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र.०१, शेगाव, जि. बुलढाणा**

(पिठासीन अधिकारी जे. आर. घाडगे)

**नि.फौ.ख. क्र. १८३/२०२२** **नि.क्र.**

महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे, शेगांव शहर,
ता. शेगाव, जि. बुलढाणा. ..**अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. मंगेश यशवंत वानखडे,
वयः २९ वर्षे, धंदाः मजुरी,
२. मिलींग यशवंत वानखडे,
वयः ३३ वर्षे, धंदाः मजुरी,
३. यशवंत इसनाजी वानखडे,
वयः ५४ वर्षे, धंदाः मजुरी,
४. सौ. शांताबाई यशवंत वानखडे,
वयः ५१ वर्षे, धंदाः मजुरी,
सर्व रा. शेगाव, ता. शेगांव, जिल्हा बूलडाणा. .. **आरोपी**

**भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये**

---

अभियोग पक्षातर्फे – सहा. अभियोक्ता, श्रीमती. पेशवाणी,

आरोपी तर्फे – अधिवक्ता श्री. बी. एस. शेगोकार,

---

**न्यायनिर्णय**

(दि. ०२.०५.२०२४ रोजी घोषित)

आरोपींविरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. प्रकरणातील फिर्यादी रोशन गजानन वाघमारे यांनी दि.०६.०७.२०२२ रोजी पो.स्टे. शेगांव शहर येथे फिर्याद दिली की, दि. ०५.०६.२०२२ रोजी ते घरी हजर असताना सायंकाळी ४.०० वाजेच्या दरम्यान त्यांच्या घरातील गॅस सिलेंडर संपल्याने ते शांताबाई यशवंत वानखडे यांच्या घरी सिलेंडर मागण्याकरीता गेले असता शांताबाईने त्याला तसेच त्याच्या पत्नीला शिवीगाळ केली व त्यावेळी तिने तिचा मुलगा मंगेश वानखडे, मिलींद वानखडे व यशवंत वानखडे यांना बोलावुन आणले व त्या सर्वानी त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी त्यांनी सर्व आरोपींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता सर्व आरोपींनी त्याला व त्याच्या पत्नीला काठीने, कु–हाडीच्या दांड्याने तसेच चापटा बुक्यांनी मारहाण करुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

३. फिर्यादी यांच्या वरील फिर्यादवरुन पोलीस ठाणे, शेगांव शहर, येथे अपराध क्र. ३२९/२०२२ नुसार आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हे. कॉ. गजेंद्र रोहनकार यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासी अंमलदार यांनी फिर्यादी व जखमीला वैद्यकीय तपासणी करीता पाठवुन त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यानंतर घटनास्थळावर जावुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपींना अटक केली आणि तपासाअंती आरोपींविरुध्द वरील कलमांन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द नि.क्र.२१ वर भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह

कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. त्यातील मजकुर आरोपींना त्यांच्या मातृभाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींविरुध्द खटला चालवित असतांना गुन्ह्या संदर्भात विधाने न आल्यामुळे, फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविण्यात आली नाही. दोन्हीं पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

५. खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.०५.०७.२०२२ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता फिर्यादीचे घरी शेगांव, ता. शेगाव येथे प्रकरणातील आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्याच्या पत्नीला काठीने व कु–हाडीच्या दांड्याने मारहाण करुन जखमी केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **.. नाही** |
| २. | वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्याच्या पत्नीला चापटा बुक्यांनी मारहाण केली हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **.. नाही** |
| ३. | वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्याच्या पत्नीकडुन एखादा हस्तक्षेपीय गुन्हा घडावा या उद्देशाने शिवीगाळ करुन जाणीवपूर्वक त्यांचा अपमान केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **.. नाही** |
| ४. | वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्याच्या पत्नीला जिवे मारण्याची धमकी दिली हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही** |
| ५. | आदेश काय ? | **..अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

६. आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदाराची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाने फिर्यादी सा. क्र.१ रोशन गजानन वाघमारे यांची साक्ष नि.क्र.२८ व सा.क्र. २ रोशनी रोशन वाघमारे यांची साक्ष नि.क्र. ३१ वर नोंदविली.

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता**

७. वरील चारही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रीतपणे नोंदविण्यात येत आहे.

८. वरील फिर्यादी साक्षीदार क्र. १ रोशन वाघमारे हे घटनेतील फिर्यादी व सा.क्र. २ रोशनी वाघमारे ह्या घटनेतील पिडीत असल्याने त्यांचेकडुन आरोपींविरुध्द पुरावा देणे अपेक्षीत होते. परंतु सरतपासणी दरम्यान फिर्यादी सा.क्र. १ रोशन व जखमी सा.क्र. २ रोशनी यांनी अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे पुरावा दिलेला नाही. साक्षीदार क्र. १ रोशन यांनी त्याच्या पुराव्यादरम्यान आरोपी त्यांचे नातेवाईक असुन एक वर्षापुर्वी दुपारी ३.०० ते ४.०० वाजेच्या दरम्यान त्यांची आरोपींसोबत सिलेंडरच्या कारणावरुन बोलचाल झाली होती त्यामुळे त्यांनी आरोपींविरुध्द रागाच्या भरात पो.स्टे.ला तक्रार दिली होती. पुढे साक्षीदाराने खुलासा केला की घटनेच्या वेळी त्यांची फक्त आरोपींसोबत बोलचाल झाली होती. पुढे साक्षीदाराने खुलासा केला की आरोपींनी सिलेंडरच्या कारणावरुन त्याला व त्याच्या पत्नीला काठीने व कु–हाडीच्या दांड्याने तसेच चापटा बुक्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली असे काही घडले नव्हते. साक्षीदाराला अभिलेखावरील रिपोर्ट व छापील एफ.आय.आर दाखविला असता साक्षीदाराने त्यावरील त्याच्या सह्या ओळखल्या परंतु त्यातील मजकुरा बाबत विचारणा केली असता साक्षीदाराने त्याला मजकुर माहिती नसल्याचे सांगीतले. पुढे साक्षीदाराने खुलासा केला की पोलीसांनी तपासादरम्यान त्याच्याकडे चौकशी करुन त्याचे बयाण नोंदविले नव्हते तसेच त्याच्या समक्ष जप्तीची कार्यवाही केली नव्हती.

९. पुढे अभियोग पक्षाचे सा.क्र. २ रोशनी वाघमारे यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कथन केले की आरोपी तिचे नातेवाईक असुन एक वर्षा पुर्वी सिलेंडरच्या कारणावरुन तिच्या पतीची आरोपींसोबत बोलचाल झाली होती व त्यावरुन तिच्या पतीने आरोपींविरुध्द पो.स्टे.ला

रिपोर्ट दिला होता. पुढे साक्षीदाराने खुलासा केला की सिलेंडरच्या कारणावरुन आरोपींनी तिला व तिच्या पतीला काठीने व कु–हाडीच्या दांड्याने मारहाण करुन त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली असे काही घडले नव्हते. पुढे साक्षीदाराने खुलासा केला की रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांनी त्यांना वैद्यकीय तपासणी करीता पाठविले नव्हते तसेच पोलीसांनी तिच्याकडे चौकशी करुन तिचा जबाब नोंदविला नव्हता.

१०. वरील दोनही साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे पुरावा देत नसल्याने अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवानगीने दोनही साक्षीदारास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले. त्यादरम्यान फिर्यादी सा.क्र. १ व जखमी सा.क्र. २ यांना घटनेच्या वेळी आरोपींनी काठीने तसेच कु–हाडीच्या दांड्याने मारहाण करुन जखमी केल्याचे तसेच त्यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे उत्तर सुचक प्रश्न साक्षीदारांवर टाकण्यात आले. परंतु, दोनही साक्षीदारांनी त्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली असल्याकारणाने अभियोग पक्ष सदर साक्षीदारांच्या पुराव्यातुन तथाकथीत घटना सिध्द करण्यात अपयशी ठरला.

११. प्रस्तुत प्रकरणात तपासलेल्या फिर्यादी तसेच जखमी साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे पुरावा दिला नसल्याने उर्वरीत साक्षीदारांची तपासणी न घेताच अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही पुरावा आला नसल्याने अभियोग पक्षाचे प्रकरण संशयास्पद झालेले आहे. तथाकथित घटनेच्यावेळी आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीला काठीने, कु–हाडीच्या दांड्याने व चापटा बुक्यांनी मारहाण करुन त्यांना शिवीगाळ केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली असे म्हणता येणार नाही. त्याकरीता आवश्यक असणारा पूरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. फौजदारी प्रकरणात आरोपीस शिक्षा करण्याकरिता अभियोग पक्षाला त्यांचे प्रकरण संशयापलीकडे जावून सिध्द करणे गरजेचे असते. परंतु, अभिलेखावरील पुरावा पाहता अभियोग पक्ष त्याकामी अपयशी झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे, मी मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. ५ च्या निष्कर्षात खालील आदेश पारीत करीत आहे:–

## आदेश

१. आरोपी क्र. १. मंगेश यशवंत वानखडे, क्र. २. मिलींग यशवंत वानखडे, क्र. ३. यशवंत इसनाजी वानखडे व क्र. ४. सौ. शांताबाई यशवंत वानखडे, यांची फौजदारी प्रक्रिया

संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ च्या शिक्षापात्र गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात आली.

२. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देण्यासंबंधी आदेश देण्यात येत आहे व त्याचे बंधपत्र व जामीनकदबा पुढील सहा महिन्याकरिता कायम ठेवण्यात यावे.

३. जप्त दोन काठ्या व एक कु–हाडीचा दांडा हे मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

**स्वा./–**

**[जे.आर. घाडगे]**

दि. ०२.०५.२०२४.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, शेगाव.

मी *के. एस. देशमुख*, लघुलेखक, (न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कोर्ट क्र.१ ले शेगांव, ता. शेगांव, जि.बुलडाणा.) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ.ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.